**<u>निशाणी क्र.६१ वरील आदेश</u>**
**नियमित दिवाणी दावा क्र.६६/२०१४**
**(सुमित प्रधान वि.पंढरीनाथ प्रधान)**

प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी फेरफार क्र.५०२४ ला निशाणी देण्याबाबत सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या कथनाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण आजरोजी युक्तीवादासाठी ठेवण्यात आलेले असुन त्यांनी निशाणी क्र.४८ व ४९ वर प्रमाणित फेरफार क्र.५०२४ दाखल केलेला असुन सदर फेरफारवर नजर चुकीमुळे निशाणी देण्यास राहुन गेलेले आहे. तरी निशाणी क्र.४८ व ४९ खाली दाखल केलेल्या कागदपत्रांना निशाणी देण्यात यावी, अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जाच्या पाठीमागील बाजुस आपले म्हणणे नमुद करुन अर्जातील कथने नाकारली आहेत. त्यांच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्यातर्फे पुरावा बंद पुरशीस दिलेली असुन सदरचे प्रकरण आजरोजी युक्तीवादाकरीता ठेवण्यात आलेले आहे. सदरचा अर्ज सदरचे प्रकरण प्रलंबित ठेवण्याकरीता दाखल केलेले आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांच्याविरुध्द वाटपाकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता वादी व प्रतिवादी यांनी या दाव्याचे कामे त्यांचा पुरावा देण्याकरीता योग्य ती संधी देणे योग्य व गरजेचे वाटते. त्याचबरोबर दावा मिळकती संदर्भात मुळ परिस्थिती अभिलेखावर येणे गरजेचे आहे. निशाणी क्र.४९ वर प्रतिवादी यांनी फेरफार क्र.५०२४ ची सही शिक्कयाची प्रत दाखल केलेली आहे. सदरचा पुरावा हा दुय्यम पुरावा आहे.

५.		दोन्ही बाजुचा पुरावा झाल्यानंतर एखादा कागद अभिलेखावर घेतांना न्यायालयाने योग्य ती खबरदारी व काळजी घेतली पाहिजे. परंतु या प्रकरणामध्ये दावा मिळकती संदर्भात मुळ परिस्थिती अभिलेखावर येण्याकरीता निशाणी क्र.४९ वर दाखल केलेला फेरफार क्र.५०२४ या उता–याला निशाणी देणे योग्य व न्यायोचित होणार आहे. अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबाबत आदेश नाही. वरील सर्व चर्चेवरुन खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१.	सदर अर्ज मंजूर करणेत येतो.

२.	निशाणी क्र.४९ वर दाखल केलेल्या **फेरफारला निशाणी क्र.६२ देण्यात येते.**

CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL

Digitally signed by CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Date: 2025.09.19 17:06:23 +0530

**फुलंब्री**		**(चंद्रकांत रामचंद्र पाटील)**

**दिनांक : १९/०९/२०२५**		**सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, फुलंब्री**